# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. १३/१२/२०१८

**शासकिय अधिका-यास कायदेशिर कर्तव्य पार न पाडणेसाठी लाच देताना श्री अजित उध्दव सुर्यवंशी, अध्यक्ष " राजवर्धन पाटील मुलांचे बालगृह,पारे, ता. खानापुर, जि. सांगली " यांना रंगेहात पकडले....**

---

श्रीमती सुवर्णा गोरख पवार,या जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, सांगली येथे कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक ०५/१२/२०१८ रोजी श्री संदीप दिवाण,पोलीस अधीक्षक,लाप्रवि पुणे यांना फोनवर संपर्क साधुन "राजवर्धन पाटील मुलांचे बालगृह,पारे, ता.खानापुर,जि.सांगली " या अनुदानित संस्थेचे अध्यक्ष श्री अजित उध्दव सुर्यवंशी, हे शासकिय कर्तव्य कायदेशिरपणे व प्रामाणिकपणे पार न पाडण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच देत असल्याची तक्रार नोंदविली. श्रीमती पवार यांना तातडीने लाप्रवि पुणे येथे येण्याची विनंती केली . त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लाप्रवि पुणे येथे तक्रार दिली. त्या तक्रारीनुसार श्रीमती सुवर्णा पवार यांना लाच देत असलेले इसम श्री अजित उध्दव सुर्यवंशी हे " राजवर्धन पाटील मुलांचे बालगृह,पारे,ता.खानापुर,जि. सांगली " या संस्थेचे अध्यक्ष आहेत.

त्यांचे बालगृहाच्या रेकॉर्डवर ८८ मुलांची नोंदणी आहे. तक्रारदार श्रीमती पवार यांनी संस्थेस भेट दिली असता, तपासणीमध्ये फक्त ७ मुले आढळुन आलेली आहेत. असे असताना श्री सुर्यवंशी यांनी खोटी मुले दाखवुन शासनाचे अनुदान लाटले आहे व चालु वर्षी मंजुर झालेले अनुदान मागणीसाठी खोटी कागदपत्रे व माहितीच्या आधारे ८८ मुले हजर असल्याची माहिती दिल्याचे श्रीमती पवार यांच्या तपासणीत निष्पन्न झालेले आहे. याबाबत सविस्तर अहवाल तयार करुन तो वरिष्ठ कार्यालयास सादर करित असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष श्री सुर्यवंशी यांना मिळाली. तक्रारदार हे दि ०५/१२/२०१८ रोजी शासकिय कर्तव्यानिमित्त पुणे येथे जात असल्याची माहिती श्री सुर्यवंशी यांनी मिळवली व त्यांच्या भ्रमणध्वनीवर सातत्याने नकारात्मक अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठवु नये यासाठी लाच देण्याचे आमिष व प्रलोभन श्रीमती पवार यांना देवु लागले. याची तक्रार श्रीमती पवार यांनी श्री संदीप दिवाण,पोलीस अधीक्षक,लाप्रवि पुणे परिक्षेत्र यांना समक्ष भेटुन लेखी दिली.

श्री सुर्यवंशी यांनी भ्रमणध्वनीवर संपर्क साधुन श्रीमती पवार यांना भेट देण्याची विनंती केल्याने त्यांना पुणे स्टेशन समोरिल सागर हॉटेल येथे भेटण्यासाठी बोलाविले. श्री संदीप दिवाण,यांच्या मार्गदर्शनानुसार तयार करण्यात आलेल्या सापळा पथकाने केलेल्या पडताळणीमध्ये अजित सुर्यवंशी यांनी त्यांच्या संस्थेच्या तपासणीचा नकारात्मक अहवाल वरिष्ठ कार्यालयास न पाठविण्यासाठी लोकसेवक श्रीमती सुर्वणा पवार यांना लाच रक्कम देणार असल्याचे निष्पन्न झाले. ही लाच रक्कम ११/१२/२०१२ पर्यंत पुणे येथे देण्याचे ठरले होते परंतु तक्रारदार लोकसेवक पवार यांच्या ठावठिकाण्याची सातत्याने माहिति ठेवुन लाच रक्कम देण्याच्या संधीची वाट पाहत होते. श्रीमती पवार हया सांगली येथे कर्तव्यावर असल्याची माहिती काढुन आज दिनांक १३/१२/२०१८ रोजी सांगली येथील मध्यवर्ती प्रशासकिय इमारत येथील श्रीमती पवार यांचे कार्यालयामध्ये आरोपी अजित सुर्यवंशी हे रुपये १,९८०००/- लाच रक्कम श्रीमती पवार यांना दिल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर पथकाने रंगेहात पकडले आहे. त्यांचेवर सांगली येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे व कोल्हापूर,लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली आहे.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज - **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.

सहायक पो. आयुक्त / पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे